सत्यमेव जयते

# महाराष्ट्र शासन

# उच्च शिक्षण संचालनालय, महाराष्ट्र राज्य, पुणे - ४११००१.

# जाहिरात

## केंद्र शासन पुरस्कृत अल्पसंख्यांक विद्यार्थ्यांसाठीची मॅट्रिकोत्तर (Post Matric) शिष्यवृत्ती योजना सन २०१३ - २०१४

मुस्लिम, ख्रिश्चन, शीख, बौद्ध व पारशी या अल्पसंख्यांक समाजातील विद्यार्थ्यांना **मॅट्रिकोत्तर (Post Matric)** शिक्षणासाठी केंद्र शासन पुरस्कृत मॅट्रिकोत्तर (**Post Matric**) शिष्यवृत्ती योजना राज्यामध्ये सन २००७-०८ पासून राबविण्यात येत आहे. या योजनेचा लाभ राज्यातील सर्व पात्र विद्यार्थ्यांना घेता यावा व त्यासाठी आवश्यक असलेला अर्ज सोयीस्करपणे उपलब्ध व्हावा आणि तो विद्यार्थ्यांना केंव्हाही सहजपणे भरता यावा, यासाठी विद्यार्थ्यांचे **नवीन शिष्यवृत्ती (Fresh) व शिष्यवृत्तीचे नुतनीकरण (Renewal) करण्यासाठी ऑनलाईन पद्धतीने अर्ज मागविण्यात येत आहेत. फक्त ऑनलाईन (Online) पद्धतीने भरलेले अर्जच स्विकारले जातील. कोणत्याही परिस्थीतीत ऑफलाईन (Offline) अर्ज स्विकारण्याची विनंती मान्य केली जाणार नाही.**
**शैक्षणिक वर्ष २०१३-१४ पासून केंद्र शासनाने नवीन शिष्यवृत्ती (Fresh) करिता ४५१८९ संच निर्धारित केलेले आहेत.**

**शिष्यवृत्तीसाठी पात्र अभ्यासक्रम :**
**११ वी ते पी. एच्. डी. / व्यावसायिक / डी. एड्. / बी. एड्. / एम्. एड्. इत्यादी तसेच सर्व आय. टी. आय. (एन्. सी. व्ही. टी.) / सर्व डिप्लोमा व अकरावी / बारावी स्तरावरील एम्. सी. व्ही. सी. अभ्यासक्रम.** (तंत्र शिक्षण विभागातील व्यावसायिक पदवी व पदव्युत्तर अभ्यासक्रम यादीतील अभ्यासक्रम सोडून इतर सर्व).

**किमान पात्रता व अटी :** (१) अर्जदार हा महाराष्ट्र राज्याचा रहिवासी असावा. (२) मागील वार्षिक परीक्षेत किमान ५० टक्के गुण घेऊन उत्तीर्ण झालेला असावा. (३) अर्जदार इतर कोणत्याही शिष्यवृत्ती योजनेचा / स्टायपेंड योजनेचा लाभार्थी नसावा. (४) नुतनीकरणासाठी विद्यार्थ्याने पुढील वर्गात प्रवेश घेतलेला असावा. (५) अर्जदाराच्या पालकांचे एकत्रित वार्षिक उत्पन्न मर्यादा रु. २.०० लाख इतकी आहे. (६) एका कुटूंबातील फक्त दोन अपत्यांनाच सदर योजनेचा लाभ घेता येईल. (७) या योजनेसाठी ३० टक्के संच मुलींसाठी राखीव आहेत. (८) एखाद्या विद्यार्थ्याने चुकीच्या माहितीच्या आधारे किंवा अटींचे उल्लंघन करुन शिष्यवृत्ती मिळवली असेल तर त्याची शिष्यवृत्ती रद्द केली जाईल / वसूल केली जाईल. (९) विद्यार्थ्याने नजीकच्या स्टेट बँक ऑफ इंडियाच्या शाखेत किंवा इतर कोणत्याही राष्ट्रीयीकृत बँकेत स्वत:चे खाते उघडणे आवश्यक आहे. स्टेट बँक ऑफ इंडियाने विद्यार्थ्यांना शुन्य रकमेवर बँक खाते उघडण्यासाठी खास सवलत दिलेली आहे. विद्यार्थ्याला मंजुर होणारी शिष्यवृत्तीची रक्कम ही त्याच्या बँक खात्यावरच जमा करण्यात येणार आहे. (१०) आवश्यक ती कागदपत्रे सोबत जोडली नसल्यास तसेच विद्यार्थ्याने आपले अर्ज प्राचार्यांच्या मार्फत न पाठविल्यास तो अर्ज अपात्र ठरवला जाईल.

**अर्जासोबत खालील आवश्यक कागदपत्रे जोडावीत :**
१) अर्जावर विद्यार्थ्याचे पासपोर्ट साईजचे छायाचित्र (फोटो) २) माध्यमिक शालान्त परीक्षा (दहावी) पासून उत्तीर्ण सर्व परीक्षांच्या गुणपत्रिकांची साक्षांकित प्रत. ३) कायम निवासाच्या पत्त्यासंबंधी पुरावा म्हणुन शिधापत्रिकेची प्रत, वीज / दुरध्वनी देयकाची प्रत, पारपत्राची प्रत, निवडणुक ओळखपत्राची प्रत यापैकी कोणताही एक पुरावा सादर करावा. ४) विद्यार्थ्याने अल्पसंख्यांक दर्जाबाबतचे, तसेच पालकांचे सन २०१२-१३ चे वार्षिक उत्पन्नाचे स्वयंघोषित घोषणापत्र (Self declared Declaration) रेव्हेन्यू स्टॅम्प लावून अर्जासोबत सादर करणे आवश्यक आहे. ५) बँक पासबुकच्या पहिल्या पानाची - ज्यावर खातेदाराचे नांव, पत्ता, खाते क्रमांक व आय.एफ.एस. सी. कोडची नोंद आहे, त्याची छायांकित प्रत. तसेच बँक खाते चालू स्थितीत असावे. ६) आधार कार्डाची छायांकित प्रत (असल्यास).

**अर्ज करण्याची पद्धत :** १) सन २०१३-१४ साठी शिष्यवृत्तीचे ऑनलाईन पद्धतीने अर्ज मागविण्यात येत आहेत. २) अल्पसंख्यांक पोस्ट मॅट्रिक शिष्यवृत्ती या योजनेच्या मार्गदर्शक तत्वानुसार पात्र व इच्छुक विद्यार्थ्यांनी **www.momascholarship.gov.in** या संकेतस्थळावरुन ऑनलाईन पद्धतीने अर्ज भरणे आवश्यक आहे. ३) ऑनलाईन अर्ज सादर करण्यासाठी प्रत्येक विद्यार्थ्याने वरील संकेतस्थळावरुन स्वत:ची आवश्यक ती माहिती भरुन स्वत:चा युजर आय.डी. तयार करुन घ्यावा. विद्यार्थ्यांनी बँक खात्यावरील नमुद पूर्ण नावानुसारच संपुर्ण नांव (स्वत:चे नांव, वडिलांचे नांव, आडनांव) टाकून नोंदणी करुनच युजर आय.डी. तयार करावा, जेणेकरुन मंजूर शिष्यवृत्ती ऑनलाईन पद्धतीने वाटप करणे बँकांना सोईचे होईल. सदरचा युजर आय.डी. विद्यार्थ्यास त्याचा अर्ज करण्यासाठी, अर्जामध्ये सुधारणा करण्यासाठी व अर्जाची सद्य:स्थिती जाणून घेण्याच्या कामी उपयोगी येणार आहे. त्यासाठी सदर युजर आय.डी. विद्यार्थ्याने कायमस्वरुपी जतन करुन ठेवणे आवश्यक आहे. ४) विद्यार्थ्याने त्याचा युजर आय.डी. वापरुन वरील संकेतस्थळावरुन त्याचा ऑनलाईन पद्धतीने अर्ज सादर करावा. तथापि, ऑनलाईन अर्ज सादर करण्यापुर्वी योजनेची मार्गदर्शक तत्वे वाचून व समजून घेऊनच ऑनलाईन अर्ज करावा. ५) अर्ज भरुन होताच विद्यार्थ्यांनी त्याची प्रिंट घ्यावी व त्यासोबत आवश्यक ती कागदपत्रे जोडून आपल्या महाविद्यालय / संस्थेमध्ये पुढील कार्यवाहीसाठी सादर करावीत. ६) ऑनलाईन अर्ज करताना काही अडचण निर्माण झाल्यास आपल्या महाविद्यालय / संस्थेशी संपर्क साधुन सदर अर्ज महाविद्यालयाच्या / संस्थेच्या मदतीने पूर्ण करुन घ्यावा. प्राचार्यांनी तो अर्ज ऑनलाईन सिस्टीममध्ये आणावा. सदर शिष्यवृत्तीचा लाभ मिळण्यासाठी आपला अर्ज ऑनलाईन सिस्टीममध्ये येणे अनिवार्य आहे.

**महाविद्यालयीन स्तरावर अर्जाची छाननी व अर्ज पाठविण्याची पद्धत :**
संबंधित महाविद्यालयाने / संस्थेने उच्च शिक्षण संचालनालयाने दिलेला युजर आय.डी. व पासवर्ड वापरुन विहित केलेल्या वेळेत लॉगीन करावे व विद्यार्थ्याने ऑनलाईन अर्जाद्वारे दिलेली माहिती त्याने दिलेल्या कागदपत्रांच्या आधारे तपासून पाहावी. अर्ज संगणकावर दिलेल्या सुविधांद्वारे निश्चित करावा. पात्र विद्यार्थ्याचा मूळ अर्ज स्वाक्षरीत करुन सहपत्रासह संबंधित विभागीय उच्च शिक्षण सहसंचालक कार्यालय **(मुंबई, पुणे, कोल्हापूर, औरंगाबाद, नांदेड, जळगांव, अमरावती, नागपूर, पनवेल, सोलापूर)** यांचेकडे पाठवून द्यावेत. ज्या शासनमान्य संस्था व महाविद्यालये यांचे नाव सदर वेबसाईटवर दिसून येत नाही, तसेच ज्या शासनमान्य संस्था व महाविद्यालये यांना अद्यापही आपले युजर आय.डी. व पासवर्ड प्राप्त झालेले नाहीत; त्यांनी आपल्या संस्था व महाविद्यालयाची संपुर्ण माहिती पुढील विहित प्रपत्रामध्ये भरुन ती नोडल ऑफिसर, शिक्षण संचालनालय, उच्च शिक्षण, महाराष्ट्र राज्य, पुणे-१ यांना ई-मेलवर **(scholarshiphd@gmail.com)** सादर करावी.
शासनमान्य संस्था व महाविद्यालये यांनी त्यांचा कार्यालयीन ई-मेल आय.डी. व प्राचार्यांचा भ्रमणध्वनी क्रमांक संचालनालयाच्या वरील ई-मेल आय.डी. वर सादर केल्यानंतरच त्यांना त्यांच्या संस्था / महाविद्यालयांचे युजर आय.डी. व पासवर्ड ई-मेल / एसएमएसद्वारे कळविण्यात येईल.

**प्रपत्र (Proforma)**

**INFORMATION OF THE INSTITUTE FOR POST MATRIC SCHOLARSHIP ONLINE REGISTRATION**

| Sr. No. | Institute Name | Govt. / Govt. Aided / Private | Whether College Jr. / Sr. | Course / Faculty | University / Board Name | Institute Address with Taluka & Pin Code | Inst. District | Details of the Principal/ Director | | | Details of the Staff handling Scholarship | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | | | | | | Name | Mobile No. | E-mail | Name | Mobile No. | E-mail |
| | | | | | | | | | | | | | |
| | | | | | | | | | | | | | |

**अल्पसंख्यांक शिष्यवृत्ती सन २०१३-१४ करिता नवीन शिष्यवृत्ती (Fresh) व नुतनीकरण (Renewal) अर्ज सादर करण्यासाठी भारत सरकारने घोषित केलेले वेळापत्रक**

| क्र. | कार्यसूची | अंतिम दिनांक | |
|---|---|---|---|
| | | नवीन शिष्यवृत्ती (Fresh) | नुतनीकरण शिष्यवृत्ती (Renewal) |
| १ | ऑनलाईन ॲप्लिकेशन सिस्टीम पद्धतीने विद्यार्थ्यांनी अर्ज करण्याचा अंतिम दिनांक | ३०.०९.२०१३ पर्यंत | १०.१२.२०१३ पर्यंत |
| २ | ऑनलाईन सिस्टीमद्वारे भरण्यात आलेल्या अर्जाची हार्ड कॉपी संबंधित विद्यार्थ्याने संस्था/महाविद्यालयास सादर करण्याचा अंतिम दिनांक | १०.१०.२०१३ पर्यंत | २०.१२.२०१३ पर्यंत |
| ३ | विद्यार्थ्यांकडून ऑनलाईन भरण्यात आलेल्या अर्जास महाविद्यालयाने ऑनलाईन मंजूरी देण्याचा अंतिम दिनांक | २०.१०.२०१३ पर्यंत | ३१.१२.२०१३ पर्यंत |
| ४ | संबंधित विद्यार्थ्यांकडून प्राप्त झालेल्या अर्जाची छाननी करून व आवश्यक त्या सर्व कागदपत्रांसह परिपूर्ण अर्जाची हार्ड कॉपी महाविद्यालयांनी संबंधित विभागीय सहसंचालक, उच्च शिक्षण कार्यालयाकडे सादर करण्याचा दिनांक | २५.१०.२०१३ पर्यंत | ०५.०१.२०१४ पर्यंत |
| ५ | संबंधित विभागीय सहसंचालक, उच्च शिक्षण कार्यालयाने महाविद्यालयांकडून प्राप्त झालेल्या अर्जांना ऑनलाईन मंजूरी देण्याचा अंतिम दिनांक | ३१.१०.२०१३ पर्यंत | १५.०१.२०१४ पर्यंत |

पात्र विद्यार्थ्यांना या शिष्यवृत्तीची मंजूर करण्यात येणारी रक्कम ही एन. ई. एफ्. टी. द्वारेच त्यांच्या बँक खात्यावर जमा करण्यात येईल, यासाठी प्रत्येक विद्यार्थ्याने त्याच्या बँक खात्याची संपूर्ण माहिती अचूक भरणे आवश्यक आहे व ती अचूक असल्याची खात्री संबंधित महाविद्यालयाने, संस्थेने व संबंधित विभागीय सहसंचालक, उच्च शिक्षण यांनी करावयाची आहे.

**नुतनीकरण :** विद्यार्थ्याने शिष्यवृत्तीच्या नुतनीकरणासाठीदेखील ऑनलाईन पध्दतीने वरील वेळापत्रकानूसार व वर नमुद कार्यपद्धतीनुसार संस्था / महाविद्यालयाकडे अर्ज करणे आवश्यक आहे.नूतनीकरणासाठी फक्त मागील वर्षाची गुणपत्रिका व बँक पासबुकच्या पहिल्या पानाची झेरॉक्स प्रत अर्जासोबत जोडण्यात यावी.

अधिक माहितीसाठी **www.momascholarship.gov.in** हे संकेतस्थळ अवलोकन करावे किंवा संबंधित विभागीय सहसंचालक, उच्च शिक्षण कार्यालयाशी किंवा उच्च शिक्षण संचालनालय, महाराष्ट्र राज्य, पुणे १ यांच्या दूरध्वनी क्रमांक ०२०-२६१२६९३९ वर संपर्क साधावा.

**(डॉ. प्र. रा. गायकवाड)**
**नोडल ऑफिसर तथा शिक्षण संचालक, उच्च शिक्षण, महाराष्ट्र राज्य, पुणे-१.**